# कार्यावली

**सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी ११-०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०१८ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली.**

**एक** . राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे.

**दोन** . राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

**तीन** . अध्यक्षांनी, सभाध्यक्ष तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

**चार** . प्रश्नोत्तरे.

**पाच** . अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सहा** . राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**सात** . सन २०१८-२०१९ चा अर्थसंकल्प सादर करणे.

**आठ** . सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**नऊ** . सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.

**दहा** . सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**अकरा** . सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान.

**बारा** . लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**तेरा** . अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**चौदा** . सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**पंधरा** . उपविधान समितीचा अहवाल सादर करणे.

**सोळा** . विधानसभा आश्वासन समितीचे अहवाल सादर करणे.

**सतरा** . अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**अठरा** . पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**एकोणीस** . रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**वीस** . महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**एकवीस** . विधानसभा विषेशाधिकार समितीचा अहवाल सादर करणे.

**बावीस** . **शासकीय विधेयक :-**

**खालील विधेयक विधानसभेकडे विचारार्थ प्रलंबित आहे :-**

सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६४.—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.





**तेवीस** . इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**चोवीस** . शोक प्रस्ताव.

**पंचवीस** . **अशासकीय विधेयके :-**

**विचारार्थ -**

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ११.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६६.—अल्पसंख्याक समाज (अत्याचारास प्रतिबंध) विधेयक, २०१५ - **श्री.अमीन पटेल, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४३.—महाराष्ट्र लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१६ - **श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५१.—महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ **- श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५.—महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १४.—महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०१७ **- श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(७) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २२.—महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ - **ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३०.—महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(९) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६९.—महाराष्ट्र लोकसेवा हक्क (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(१०) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७०.—सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

सव्वीस . **अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६) :-**

**श्री. सुनिल शिंदे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १, ७, ८, ९ व १०**

(१) "कोकण रेल्वेच्या उभारणीसाठी महाराष्ट्रसह गोवा, केरळ व कर्नाटक या राज्यांनी त्यांच्या राज्यात बांधलेल्या रेल्वेमार्गाच्या प्रमाणात निधी दिलेला असणे, रेल्वे मंत्रालयाने उर्वरित खर्चापोटी सार्वजनिक कर्ज रोख्यांद्वारे जनतेकडून पैसे गोळा केलेले असणे, परिणामी सुमारे ३५५० कोटी रुपये खर्चापोटी हा प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण होऊन रेल्वे मार्गाही वाहतुकीस खुला झालेला असणे, सदर रेल्वे सुरू झाल्यानंतरही आर्थिक अडचणी येऊ नयेत, याकरिता काही कालावधीकरिता कोकण रेल्वेच्या रोहा ते मंगलोर या अंतरासाठी ४० टक्के अधिक भाडे आकारण्यात येणे, कोकण रेल्वे सुरू होऊन सुमारे १५ वर्षे लोटूनही कोकण रेल्वे महामंडळ सद्यस्थितीत नफ्यात असूनही कोकणी तसेच गोवा, केरळ, कर्नाटक येथे जाणाऱ्या जनतेकडून टक्के अतिरिक्त भाड्याचा बोजा अजूनही चालू ठेवणे हे अन्यायकारक असणे, त्यामुळे कोकण रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या डोक्यावरील हा अतिरिक्त भाड्याचा बोजा तात्काळ दूर करून भारतीय रेल्वेच्या चालू दरपत्रकाप्रमाणे कोकण रेल्वे प्रवासी भाडे आकारण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका धरावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७) "देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान असणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८) "राज्याची वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे राज्यातील विविध शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपास कामात होत असलेला विलंब, परिणामी पिडित महिलांना न्याय मिळण्यात होत असलेल्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, त्यासाठी पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांची मानसिक स्थितीत सुधारणा करण्याबाबत, तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९) "मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास महामंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्याच्या कालावधीत इमारत कोसळून जीवित आणि वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्य रीतीने पाहणी करून त्याचा पुनर्विकास करणे, पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून होत असलेला मोठ्या प्रमाणावरचा भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाश्यांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."





(१०) "मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळ पसरलेले असणे, मुंबई शहरातून सर्वाधिक महसूल प्राप्त होऊनही केंद्राकडून राज्यास पुरेशा प्रमाणात निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित रेल्वे प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधाकरिता आवश्यक निधीची तरतूद करून व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता 'स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २, ३, ४, ५ व ६**

(२) "राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावांतून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्यांच्या अंमलबजावणीत होणारी कुचराई, यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्याअभावी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) "राज्यातील देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी

विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६) "राज्यातील सर्व महामार्गावरील रहदारी ही मोठ्याप्रमाणावर वाढली असून त्याचे योग्यरीत्या नियोजन होणे, अरुंद रस्ते, वळणे यामुळे अपघातांचे वाढते प्रमाण, त्यात होत असलेली मनुष्यहानी व वित्तहानी बघता यावर उपाय म्हणून सर्व राज्य महामार्ग व त्यांना जोडणारे रस्ते हे चौपदरीकरण करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अजित पवार, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११, १२, १३, १४ व १५**

(११) "पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासिन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात वाडे कोसळून जीवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरीत्या पाहणी न करणे, तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरिता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरिकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करून परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."



(१३) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्यान नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१५) "महाराष्ट्राचे भाग्यविधाते महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेले स्वतंत्र महाराष्ट्राचे जनक, आपले सर्व आयुष्य राष्ट्र उभारणीच्या कार्यात वेचणाऱ्या, तळागाळातील समाजासाठी आर्थिक विकासाची योजना राबविणारे दिन-दलिताचे नेते यशवंतराव चव्हाण यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. शशिकांत शिंदे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १६, १७, १८ व २०**

(१६) "महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चिरंतर स्मरणात राहावे, यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७) "शेतकऱ्यांना शेती व्यवसासासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८) “राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरीत्या सोडविण्यासाठी धरण,तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२०) “केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २१, २२ व २३**

(२१) “मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, मुंबई शहरातून सर्वाधिक महसूल प्राप्त होऊनही केंद्राकडून राज्यास पुरेशा प्रमाणात निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित रेल्वे प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधाकरिता आवश्यक निधीची तरतूद करून व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता ‘स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ’ स्थापन करावे अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२२) “राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, त्यांचे व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२३) “राज्यातील विनानुदानित तत्त्वावर मान्यता देऊन सुरू करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदाना अभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि इतर शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा विपरित परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २५, २६ व २७**

(२५) “राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”



(२६) “खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन योजना तसेच उपसा जलसिंचन योजना/ पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत राहणे, त्याचा लाभ शेतकऱ्यांना न होणे, तसेच नवीन प्रकल्प योजना होणे गरजेचे असताना प्रकल्प न होणे, प्रकल्प न झाल्याने शेतकऱ्यांची सिंचनाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने सदर गैरसोय लक्षात घेता खानदेशाची प्रगती होण्याचे दृष्टीने सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२७) “राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायती राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २८, २९, ३०, ३६ व ३७**

(२८) “ठाणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जीवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरीत्या पाहणी न करणे तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे त्यामुळे ठाणे महापालिका क्षेत्राकरिता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरिकांची असलेली मागणी या संदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२९) “राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३०) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३६) “ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा व कळवा ही शहरे एका बाजूने डोंगर व दुस-या बाजूने समुद्रखाडी यामध्ये वसलेली असून शहरातील नागरीकरणाचा प्रचंड वेग लक्षात घेता, मूलभूत सोयीसुविधांवर पडत असलेला प्रचंड ताण, या शहरांचा विकास नियोजनबद्ध होणेसाठी लागणारा कोट्यावधी रुपयांचा निधी, हा निधी उपलब्ध करून देण्याची स्थानिक प्रशासनाची आर्थिक क्षमता नसल्याने या परिसराला मूलभूत सुविधा मिळाव्यात व या शहरांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जादा निधी मिळण्याची नितांत आवश्यकता, येथील विकासाच्या कामांची कालमर्यादा निश्चित करून ही शहरे उच्च दर्जाची व्हावीत यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३७) “राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध होत नसल्याने उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत असणे, लाखो तरुण नोकरी, रोजगारासाठी भटकत असणे, स्थानिक भूमिपुत्रांना नोक-या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, दिवसेंदिवस सदरची समस्या गंभीर स्वरुपाची बनत चाललेली असणे, राज्यातील बेरोजगार भूमिपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनेवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. हनुमंत डोळस, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३१, ३२, ३३, ३४ व ३५**

(३१) राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमिपूत्राच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय,निमशासकीय तसेच खाजगी



आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३२) शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३३) राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणामुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल, विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३४) “राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या जिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षांत घेता राज्यांतील जलप्रदूषण प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३५) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. संजय कदम, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३८, ४१ व ४२**

(३८) “ठाणे, सिंधुदुर्ग,रत्नागिरी व रायगड या जिल्हयांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे,दरवर्षी अनेकवेळा फुटल्यामुळे

समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षांत घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा, गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होवू नये यासाठी शासनाने या चारही जिल्हयातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(४१) “कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निमिर्तीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी, कोकणातील जिल्हयांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरीता शासनाने एक खास कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वेरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(४२) “कोकणातील सर्व पर्यटन स्थळांचा व तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी व भाविकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे तेथील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच या सर्व पर्यटन व तिर्थ क्षेत्राचे महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४३, ४४, ४५, ४६ व ४७**

(४३) “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावंर



उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(४४) “जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याच्या दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(४५) “राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरू करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा,ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होवू शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदानतत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(४६) “राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण,तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(४७) “राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने हया सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. दिपक चव्हाण, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४८, ४९, ५० व ५१**

(४८) “राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमिपूत्राच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी

आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(४९) “जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याच्या दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(५०) “महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चिरंतर स्मरणात राहावे, यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(५१) “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्या रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ५३, ५४, ५५ व ५७**

(५३) “देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर “भारतरत्न प्रदान” करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(५४) “महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या सोयीसाठी मा.सर्वोच्च न्यायालयाचे एक खंडपीठ मुंबई येथे स्थापन करावे, अशी आग्रही मागणी राज्य शासनाने, केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(५५) “मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होऊनही, केंद्राकडून पूरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरीता, आवश्यक निधीची तरतूद करून व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र



राज्याकरिता, “स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ” स्थापन करावे अशी आग्रही मागणी, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(५७) “मुंबईसह राज्यात रेडी रेकनरच्या दरात दरवर्षी वाढ होत असल्याने, सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होत असणे, विभागीय सर्वोच्च विक्री दर रेडिरेकनरमध्ये ग्राहय धरण्यात येत असल्याने, सदनिकांच्या किंमती, मुळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढणे यामुळे सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे. सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी रेडी रेकनरचे वाढते दर स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी याबाबत राज्य शासनाने आवश्यकती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ५८ व ६१**

(५८) “राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(६१) “देशाला स्वांतत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमीप्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ६२, ६३, ६४, ६५ व ६६**

(६२) “राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने हया सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(६३) “राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा,

शेतात राबविल्या जाणाऱ्या उस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६४) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६५) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६६) "राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षांत घेता राज्यांतील जलप्रदूषण प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती दिपिका चव्हाण, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ६९, ७०, ७१ व ७२**

(६९) "राज्यात व देशामध्ये स्त्री शिक्षणाची गुढी उभारणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रातील व देशातील जनतेला प्रेरणा देणारे आहे. महिलांच्या कल्याणासाठी व त्यांच्या उत्थानासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे. अशा या थोर व्यक्तींना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."



(७०) "राज्याच्या सुवर्ण चतुःष्कोनातील एक महत्त्वाचे शहर असल्याने नाशिक शहराला लागू असलेल्या ग्रामीण भागाचे झपाटयाने शहरीकरण होत आहे. त्यामुळे येथील पायाभूत सुविधांचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी एमएमआरडीए मुंबई व नागपूर सुधार प्रन्यासच्या धर्तीवर नाशिक क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करून ह्या प्राधिकरणाला निधी उपलब्ध करून द्यावा,अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७१) "सोलापूर विद्यापीठाचा 'राजमाता अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ' तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला 'बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने या विद्यापिठांचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७२) "महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चिरंतर स्मरणात राहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. वैभव पिचड, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ७४, ७५, ७६ व ७७**

(७४) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७५) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७६) "दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगांच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न

मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(७७) “राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरू करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. राहुल जगताप, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ७९, ८०, ८१, ८२ व ८३**

(७९) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८०) “राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्ष तोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८१) “राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८२) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पिकविमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”





(८३) “राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायती राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ८४, ८५, ८६, ८७ व ८८**

(८४) “तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंडही सोसावा लागू नये यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८५) “राज्यात दिवसेंदिवस जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी होत असल्याने व त्यातच पावसाचे प्रमाण देखील कमी होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा दिवसेंदिवस ज्वलंत होत चाललेला प्रश्न लक्षात घेता जलसंधारणाचा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८६) “राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना शासकीय सेवेत काही जागांचे आरक्षण ठेवण्याची तरतूद करण्याबाबत व त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आखण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८७) “राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षांत घेता राज्यातील जलप्रदूषणास प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८८) “कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण,

जि.रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी, कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ८९, ९१, ९२ व ९३.**

(८९) ''राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या उस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(९१) ''राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(९२) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(९३) ''राज्यात उद्योग जगात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगामध्ये भूमीपुत्राची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगामध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने





राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपुत्रांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयामध्ये नोकरी देताना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ९४, ९५, ९६, ९७ व ९८**

(९४) ''राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(९५) ''राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण,तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(९६) ''राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(९७) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(९८) “राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या जिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणास प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. राहुल मोटे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १००, १०१, १०२, १०३ व १०४**

(१००) “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१०१) “राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीसाठी योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करून आवश्यक असेल तेथे नद्या, खाड्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१०२) “राज्यात अनेक कुटुंबाचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्र्यरेषेखालील पिवळ्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने रुपये १५,००० वार्षिक उत्पन्न दारिद्र्यरेषेची मर्यादा १० वर्षापूर्वी ठरविली असणे, तसेच शासनाने नेहरु रोजगार व सुवर्ण जयंती योजनेसाठी दारिद्र्य रेषेची मर्यादा रुपये २५,००० ठरविली असणे, यामध्ये स्वतःच्या मालकीचे घर, कलर टी.व्ही., गॅस, दुचाकी वाहन या अटी शिथिल केल्या असणे, एकाच शासनाचे दारिद्र्य रेषेसाठी असलेले दोन निकष हे विसंगत असणे, यात धान्य वाटपासाठी केंद्र शासनाने ६५.३४ लाख लाभार्थ्यांची संख्या ठरवून दिली असून प्रत्यक्षात ७३.४० लाख लाभार्थी निवडण्यात आलेले असणे, त्यामुळे केंद्राकडे मिळणारे धान्य अपुरे असल्याने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची मर्यादा रुपये १५,००० वरून



रुपये ५०,००० करण्यात यावी व केंद्र शासनाकडून अतिरिक्त धान्याचा कोटा राज्यात देण्याची शासनाने मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१०३) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१०४) “दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगांच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १०५, १२३ व ३७५**

(१०५) “राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१२३) “राज्यात अनेक कुटुंबांचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्र्य रेषेखालील पिवळ्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने रुपये १५,००० वार्षिक उत्पन्न दारिद्रेरेषेखलील मर्यादा १० वर्षापूर्वी ठरविली असणे, तसेच शासनाने नेहरु रोजगार व सुवर्ण जयंती योजनेसाठी दारिद्र्य रेषेची मर्यादा रुपये २५,००० ठरविली असणे, यामध्ये स्वतःच्या मालकीचे घर, कलर टी.व्ही, गॅस, दुचाकी वाहन या अटी शिथिल केल्या असणे, यात धान्य वाटपासाठी केंद्र शासनाने ६५.३४ लाख लाभार्थ्यांची संख्या ठरवून दिली असून प्रत्यक्षात ७३.४० लाख लाभार्थी निवडण्यात आले असणे, त्यामुळे केंद्राकडून

मिळणारे धान्य अपुरे असल्याने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची मर्यादा रुपये १५,००० वरून रुपये ५०,००० करण्यात यावी व केंद्र शासनाकडून अतिरिक्त धान्याचा कोटा राज्यास देण्याची शासनाने मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३७५) “राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलावंरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासणीत होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, त्यांच्यावरील वाढत चाललेले हल्याचे प्रमाण, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलावंरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. वैभव नाईक, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १०६, १२१, १२२ व १२४**

लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या लगतच्या ग्रामीण परिसरात महानगर मधील कचरा टाकतांना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यपातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २६१, २६२, २६३ व २६४**

(२६१) "राज्यातील देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६२) "रस्त्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने काही अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्र उभारावीत व प्रत्येक आरोग्य केंद्रात एक रुग्णवाहिका उपलब्ध ठेवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६३) "राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."



(२६४) "राज्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २६५, २६७ व २६८**

(२६५) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करून त्याचा विकास करणे, पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६७) "रस्त्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने काही अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्र उभारावीत व प्रत्येक आरोग्य केंद्रात एक रुग्णवाहिका उपलब्ध ठेवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६८) "राज्यातील दारिद्र्यरेषेखालील व वयाची ६० वर्षे पूर्ण करणाऱ्या वयोवृद्ध शेतकऱ्यांना तसेच रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कष्टकरी मजुरांना दरमहा ५०० ते १००० रुपये निवृत्ती वेतन शासनाकडून देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २८५, २८६, २८७ व २८८**

(२८५) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण,

त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासणीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८६) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८७) "राज्यातील ग्रामीण भागात महिलांकरिता स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावात महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक महिला स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८८) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरीकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपदग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. नसीम खान, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २८९, २९०, २९१ व २९३**

(२८९) "मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबद्ध कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९०) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करुन त्याचा विकास करणे, पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत



पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात सांकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९१) "राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९३) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपदग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २९६, २९७, २९८, ३२५ व ३२६**

(२९६) "तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांची त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही. तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही. यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९७) "देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९८) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३२५) "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळात दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३२६) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २९९, ३००, ३०१ व ३०३**

(२९९) "दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्व्हेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधा पत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रूपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रूपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रूपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३००) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०१) "मराठी भाषेला अभिजात भाषा हा दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०३) "दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करतांना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्व्हेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधा पत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रूपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रूपयाचे झालेले अवमूल्यन





यामुळे रूपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. शिवाजीराव नाईक वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३०४, ३०५ व ३०६**

(३०४) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करित आहे."

(३०५) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०६) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी व विद्युत पंपांचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब, त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. विजय काळे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३०७, ३०८, ३०९, ३२३ व ३२४**

(३०७) "राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०८) “राज्यात देशी खेळाऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरूण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३०९) “राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होत असलेला तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३२३) “देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वात्रंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तवर ‘भारतरत्न’ प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३२४) “पुणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासिन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात वाडे कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्रातील मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरिकांची असलेली मागणी, या संदर्भात सकारात्मक विचार करून परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”





**डॉ. अशोक उईके वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३१०, ३१४ व ३१५**

(३१०) “राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्याप पुर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल त्यामुळे शासनाच्या विचारधिन प्रकल्पासाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशिर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पुर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३१४) “राज्याच्या ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन निट होत नाही त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आह.”

(३१५) “राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीसाठी योग्य व्हावीत याकरीता सर्व ग्रामिण भागातील रस्त्याची पाहणी करून आवश्यक असेल तेथे नद्या, खाड्या, नाले व मोऱ्या यांचेवर पुल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्रीमती माधुरी मिसाळ वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३११, ३१२, ३१३ व ३१७**

(३११) “राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३१२) “राज्यात देशी खेळाऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरूण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३१३) “राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या

मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होत असलेला तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३१७) "दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखालील असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्यावतीने रूपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रूपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रूपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. दिलीप वळसे-पाटील वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३१८, ३१९, ३२०, ३२१ व ३२२**

(३१८) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसानभरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषांमुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३१९) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती तसेच इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, महानगरपालिका क्षेत्राबाहेर लगतच्या



ग्रामीण परिसरात महानगरामधील कचरा टाकतांना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचराडेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३२०) "महाराष्ट्राचे भाग्यविधाते महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालले स्वतंत्र महाराष्ट्राचे जनक, आपले सर्व आयुष्य राष्ट्र उभारणीच्या कार्यात वेचणाऱ्या, तळागाळातील समाजासाठी आर्थिक विकासाची योजना राबविणारे दिन-दलितांचे नेते यशवंतराव चव्हाण यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३२१) "पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासिन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जीवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करून परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३२२) "जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याच्या दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राजेश काशीवार, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३२७, ३२८, ३२९, ३३० व ३३१**

(३२७) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार

कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावंर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३२८) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापीत झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पुर्ण झाले नसल्यामुळे विस्थापीतांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमीनी देण्यासाठी शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी लक्षात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३२९) "विदर्भात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन विदर्भात सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३०) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही आणेवारी व उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे विदर्भातील शेतकरी पीक विमा नुकसानभरपाई पासून आजही वंचित राहत असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रीटीश आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असणे, त्यामुळे त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रहाची भूमीका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३१) "राज्यातील विशेषतः विदर्भातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस तयार असावीत, याकरीता विदर्भातील ग्रामिण भागातील रस्त्यांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी नद्या, खाड्या, नाले व मोऱ्यांवर पुल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि ग्रामिण भागात रस्त्यांची दुरुस्ती व मजबूतीकरणासाठी अपेक्षित निधी उपलब्ध करून द्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. छगन भुजबळ वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३३२, ३३३, ३३४ व ३३५**

(३३२) "राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना व्यवस्थापनाअभावी बंद पडतात, त्यामुळे



सदर योजनांची देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३३) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३४) "दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखालील असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्यावतीने रूपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रूपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रूपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३५) "सोलापूर विद्यापीठाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असा नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने मागणीप्रमाणे या विद्यापीठाचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. किसन कथोरे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३३८ व ३३९**

(३३८) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजना कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्य भूमिपुत्रांना नोकऱ्या नसल्याने राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणामध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमिपुत्राच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी अस्थापनावरील कार्यालयामध्ये नोकरी देताना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत सामावून घेण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३९) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तत्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संदीप नाईक, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३४१, ३४२ व ३४५**

(३४१) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमिपूत्राच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३४२) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३४५) "राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."



**श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३४६, ३४७ व ३४८**

(३४६) "राज्यातील मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, कल्याण-डोंबिवली आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोखसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्यांची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरपालिका कचरा टाळतांना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरात नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदुषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र "कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ" स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३४७) "राज्यातील दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्ष तोडीने होणारी जमिनीची धूप पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३४८) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राज पुरोहित, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३५१ व ३५४**

(३५१) "मुंबई शहरातील मरीन लाईन्स रेल्वेस्थानकाचे नामकरण करून त्यास मुंबादेवी असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३५४) "मुंबईतील चर्नीरोड रेल्वे स्थानकाला गिरगाव व ग्रँट रोड रेल्वे स्थानकाला ऑगस्ट क्रांती हे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुरेश गोरे, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ३५५**

(३५५) "राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही. त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३५७, ३५८, ३५९ व ३६०**

(३५७) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पादनाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित रहात असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीश व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३५८) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३५९) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीने प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशी अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३६०) "राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."



**ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३६६, ३६७, ३६८, ३६९ व ३७०**

(३६६) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जीवितहानी व वित्तहानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरीत्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाश्यांत पसरलेला तीव्र असंतोष, यासंदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३६७) "राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३६८) "ठाणे, रत्नागीरी, रायगड व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेत जमिनीत शिरून मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांचे व लोकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंबलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३६९) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र विकसित करण्याबाबत तसेच त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३७०) "राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवांच्या उपजीविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ३७३**

(३७३) "राज्यामध्ये कोट्यावधी रुपये खर्च करून गेल्या काही वर्षाच्या काळामध्ये ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी अनेक प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना शासनाने तयार केल्या आहेत. त्यापैकी बऱ्याच योजना वर्षानुवर्षे बंद आहेत. त्या योजना चालू करण्याच्या दृष्टीने शासनाला उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या १५ सदस्यांची समिती शासनाने नेमावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. योगेश सागर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३८१, ३८२, ३८८, ३८९ व ३९०**

(३८१) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या ओद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांकडे अत्याधुनिक शस्त्रांची कमतरता, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिला, मुली व बाललैंगिक अत्याचाराचे वाढते प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्यामुळे तपासणीत होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणारा विलंब त्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, पोलिसांच्या कामाची वेळ ८ तास केल्यामुळे आणखीन पोलिसांची निर्माण झालेली गरज, पोलिसांच्या संख्येत वाढ करून त्यांना अत्याधुनिक शस्त्रे पुरविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी. अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८२) "राज्यातील जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८८) "राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."



(३८९) "मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३९०) "राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीमुळे होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. समीर कुणावार, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३८३, ३८४, ३८५, ३८६ व ३८७**

(३८३) "देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभुमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांना 'मरणोत्तर भारतरत्न' प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८४) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषांमुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८५) "विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती करुनही विदर्भातच मोठ्या प्रमाणात भारनियमन होणे, भारनियमानामुळे विद्यार्थ्यांचे होणारे

शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थिक नुकसान, विजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे, यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भालगत असलेल्या छत्तीसगड राज्यात उद्योगांना वीज सवलतीच्या दरात उपलब्ध होत असल्याने उद्योग त्या राज्यात जाणे, परिणामी विदर्भाच्या वाट्याला प्रदूषण येऊन ही विकासही न होणे, विदर्भात उत्पादित उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची गरज लक्षात घेता तसेच विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजनना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८६) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमीन देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८७) "राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३९६, ३९७, ३९८, ३९९ व ४००**

(३९६) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासणीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."



(३९७) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३९८) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पादनाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित रहात असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३९९) "राज्यातील दारिद्र्य रेषेखालील व वयाची ६० वर्षे पूर्ण करणाऱ्या वयोवृद्ध शेतकऱ्यांना तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या कष्टकरी मजुरांना दरमहा रुपये ५०० ते १००० निवृत्तीवेतन शासनाकडून देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४००) "राज्यात व देशामध्ये स्त्री शिक्षणाची गुढी उभारणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रातील व देशातील जनतेला प्रेरणा देणारे आहे, महिलांच्या कल्याणासाठी व त्यांच्या उत्थानासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे, अशा या थोर व्यक्तींना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**सत्तावीस** : सभागृहासमोर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल.).

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २२ फेब्रुवारी २०१८.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई